# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३०-११-२०१२ रोजी (का.प.क्र.०३)संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनाक ३०-११-२०१२ रोजी मा.महापौर सौ.कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " येथे दु.११.५० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.रंविद्र निकम तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
३. स.स.डॉ.खान जफर अहेमद
४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
६. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
७. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
८. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
९. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१०. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
११. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१२. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१३. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१४. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१७. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१८. स.स.श्री.बोराडे रामदास काशिनाथ
१९. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२०. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२१. स.स.श्री.शिंदे राजू रामराव

२२. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२३. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

२४. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी

२५. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास

२६. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद

२७. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान

२८. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग

२९. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार

३०. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ

३१. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

३२. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र

३३. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये

३४. स.स.श्रीमती कविता संजय जाधव

३५. स.स.श्री.जगदिश कन्हैयालाल सिध्द

३६. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली

३७. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान

३८. स.स श्री.अफसर खान यासीन खान

३९. स.स.श्री.फिरदोस फातेमा खान

४०. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

४१. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग

४२. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल

४३. स.स.देसरडा प्रशांत सुभाष

४४. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा

४५. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

४६. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान

४७. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरैशी

४८. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर

४९. स.स.श्री.खान आगा मिया खान

५०. स.स.श्री.नासेर खान अब्दुल रहेमान खान

५१. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर

५२. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५३. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५४. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
५५. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
५६. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव
५७. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५८. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५९. स.स.श्री.शिंदे सत्यभामा दामोदर
६०. स.स.श्री.निलाबाई देविदास जगताप
६१. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६३. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
६४. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६५. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
६६. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
६७. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
६८. स.स.श्री.निमगावकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७०. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७१. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
७२. स.स.श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले
७३. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७४. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
७५. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
७६. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
७७. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम
७८. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

मा. महापौर :- शिक्षण विभागाच्या संदर्भातील सभा आता घेत आहोत. तहकुब सभा दुपारी घेण्यात येईल.

**विषय क्र.२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्र. संकीर्ण २०१२/अनौ १८३/प्र.क्र. ३२१/१२/नवि-२६ दिनांक २० नोंव्हेबर २०१२ रोजीचे शासन आदेशानुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम -२००९ या कायद्यातील महत्वाच्या तरतुदीची माहिती होण्यासाठी व या सभेमध्ये शिक्षण विभागाचे अधिकारी सर्व सदस्य /पदाधिकारी यांना मार्गदर्शन करतील उपरोक्त अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती उपाययोजना करणे.

**संवाद :**

शिक्षणाधिकारी :बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार राज्य शासनाने निर्देशीत केल्या नुसार आजच्या विशेष सर्वसाधारण सभेचे मा.महापौर यांनी आयोजन केले या सभेत उपस्थित सर्व महानगरपालिकेचे स. पदाधिकारी व सर्व पालिका सदस्य यांचे प्रशासनाच्या वतीने अभिनंदन करते स. पदाधिकारी यांचा प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात येतो.

या वेळी प्रशासनाच्या वतीने स. पदाधिकारी यांचे पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात येते.

शिक्षणाधिकारी :आजच्या सभेतील विषयाच्या अनुषंगाने मा.आयुक्त हे सभागृहाला माहिती देतील त्यानंतर शासनाचे प्रतिनिधी म्हणून अधिकारी येथे आहे ते या कायदया विषयी माहिती देतील.

मा.आयुक्त :स.महापौर स.सर्व पदाधिकारी व स.सदस्य तसेच कार्यशाळेसाठी राज्य शासनाच्या वतीने उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद पुणे चे संचालक मा.श्री.जरग साहेब तसेच त्यांचे सोबत असलेले सर्व अधिकारी कर्मचारी या सर्वांचे स्वागत करतो. महाराष्ट शासनाचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे की राज्यामध्ये सर्व महानगरपालिका व सर्व जिल्हा परिषदेमध्ये सर्व ठिकाणी या संदर्भात विशेष सभा आयोजित करून राज्यामध्ये मोठी शैक्षणिक चळवळ या निमित्ताने उभा राहणेसाठी व शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी एक पुढचे पाऊल शासनाने उचलले राज्यभर अशा विशेष सभा व शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम २००९ या संदर्भात आयोजित करण्यात आल्या आहेत.सर्वत्र जनजागृतीकरण करण्यासाठी या सभांचे आयोजन करण्यात आले मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम हा २००९ मध्ये मंजूर झालेला आहे.केंद्र शासनाने यासाठी ८६ व्या घटना दुरूस्ती केली आणि राज्य घटनेचा कलम २५ अे नुसार शिक्षणाचा मुलभूत अधिकार याचा समाविष्ट यामध्ये करण्यात आला शिक्षणाच्या सार्वत्रिकरण करण्याचे प्रक्रियेमधला हा एक सर्वात मोठा टप्पा आहे असे मानतो.शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी यापुर्वी शिक्षणाचे प्रयोग केंद्रामध्ये राज्यामध्ये झाले सर्व शिक्षा अभियात हा त्यातील एक भाग होता यातून तळागाळातील बालकांना शिक्षण पोहचले पाहिजे अशी

शासनाची भुमिका होती त्यात काही कमतरता वाटल्या म्हणून याद्वारे आता शिक्षणाचा अधिकार मुलासाठी दिला आहे.यात ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आणि हा त्यांचा मुलभूत अधिकार मानला गेला ही जबाबदारी शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था,शाळा शिक्षक आणि पालक या सर्वांवर टाकण्यात आली आहे.नुसते शिक्षण नव्हते तर चांगले शिक्षण कसे दिले जाईल हे बघण्याची गरज आहे.मुख्य म्हणजे मुलांना शाळेच्या प्रवाहमध्ये आणणे,दर्जेदार शिक्षण देणे सातत्यपुर्ण सर्वकश मुल्यमापनाच्या अधारे त्याची शैक्षणिक प्रगती गुणवत्ता उंचावत ठेवणे शाळेतील ज्या समस्या आहे जसे पाण्याची समस्या ,शौचालय असेल शुध्द पाणी देणे हया सर्व सुविधा देणे गरजेचे आहे शहराची गरज लक्षात घेवून शाळेचे कार्यक्रम व शिक्षणाचा आराखडा तयार करणे त्याप्रमाणे पुढे जाणे शिक्षणाच्या कायदयाची अमलबजावणी करणे अशा महत्वाच्या तरतूदी या कायदयामध्ये आहे.ही जबाबदारी आपणांसर्वांवर टाकली आहे सांगायला अभिमान वाटतो या सर्व कार्यकाळात औरंगाबाद महानगरपालिका यामध्ये अ्ग्रेसर आहे.२००९ चा हा कायदा एप्रिल २०१० पासून अमलांत आला त्यानंतर लगेचच महानगरपालिकेने यशदाच्या मदतीने त्यांचे मार्गदर्शनाने अनेक प्रयोग या अधिनियमाच्या अन्वये सुरू केले. पहिला प्रयोग केला शाळा बाहय असलेली मूले शिक्षणापासून वंचीत राहू नये ५ हजार मुले शाळा बाहय असलेले शोधून काढले यासाठी सर्व स.पदाधिकारी लोकप्रतिनिधी तसेच सर्व सदस्यांचा सहभाग लाभला यासाठी कार्यशाळा घेतल्या जनजागृती अभियांन राबविले सर्वे केला अधिकारी कर्मचारी सकाळी ६ ते रात्री १० पर्यंत अधिकारी कर्मचारी लोकांच्या घरी जावून त्यांचे कन्व्हेन्सप्रमाणे सर्वे करण्याकरीता कर्मचारी कामाला लावले ५ हजार मुले शोधली त्यांना शाळेत येणेसाठी प्रवृत्त केले त्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी महापालिकेने भाऊ-दिदिचा प्रयोग केला त्या माध्यमातून जी मुले शिक्षणापासून संचित होती त्यांना पुढे नेण्याचे त्यांना शिक्षण देण्याचे काम महापालिकेने काम केले करीत आहे.याची राज्यभर नोंद घेण्यात आली व मुख्य सचिव मा. श्री.रत्नाकर गायकवाड यांनी यांचे उदाहरण देवून सर्व जिल्हा परीषद नगरपालिकासाठी एक जीआर काढला कार्यशाळा घेण्याचे आयोजित केले त्यानुसार कार्यशाळा सुध्दा घेतली जवळपास ५०० भाऊ दिदी म्हणून व्यक्ती नेमले शाळा बाहय मुलांचे जे प्रश्न असतात ते समजावून घेणे हे आवश्यक असल्यामूळे हा पहिला प्रयोग राज्यात असा झाला की महापालिकेचे ५०० शिक्षक यांना समुपदेशक म्हणून यशदाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. जे शाळाबाहय मुले आहे जे व्यसनी आहे त्यांना कुटूंबासाठी पैसे कमवावे लागतात शिक्षणासाठी वेळ कमी पडतो जे प्रश्न निर्माण झाले या प्रश्नांना सोडविण्यासाठी अनेक प्रकारे प्रयोग या राबविले एक

स्वयस्पुर्ती बालक कसा असला पाहिजे पध्दती कशी असावी हे विकसीत करण्याचा प्रयत्न केला.त्याच माध्यमातून एक पुस्तक तयार करण्यात आले ते शोध मुलांच्या मनाचा यात मुलांचे वेगवेगळे प्रश्न आहेत त्यास कसे सामोरे जाता येईल तथापि शासनाच्या धोरणानुसार आज या ठिकाणी विशेष सभेचे आयोजन केले शासनाचे जे अधिकारी श्री.जरग व त्यांचे जे सहकारी येथे आले आहे त्या सर्वाचे सभागृहाच्या वतीने स्वागत,शासनाच्या ज्या अपेक्षा आहे त्या पेक्षा ही पुढे जाण्याचा महापालिकेचा प्रयत्न राहिल यासाठी सर्व स. पदाधिकारी स.सदस्य यांचा सहयोग असावा आपण सर्व मिळून यासाठी प्रयत्न करू.

(या नंतर महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री ,तसेच शालेय शिक्षण मंत्री मा.श्री.राजेंद्र दर्डा , मा.श्रीमती फौजिया खान तसेच शासनाचे मा.मुख्यसचिव तसेच मा. अपर मुख्य सचिव यांचा पावर पॉईन्ट प्रेझेंटेशननुसार संदेश एकविण्यात येतो.)

यानंतर महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद पुणे संचालक मा. श्री. नामदेवराव जरग यांनी पावर पॉईन्ट प्रेझेंटेशननुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ बाबतची माहिती दिली तसेच कलम २ ते ३१ नुसार शाळा व्यवस्थापन मुख्याध्यापक शिक्षक व पालक यांनी कोणती काळजी घेणे गरजेचे आहे या बध्दलची सविस्तर माहिती दिली व सदस्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तर दिली.

श्री.खाजा शरफोद्दीन :माझा वार्ड हमालवाडा रेल्वेस्टेशन भागात गरीबांची मुले आहे ८ वी वर्गात शिकतील अशी मूले आहे ते आता शिकत नाही अशा मुलांचा सर्वे करावा शाळा सुरू करावी मा.आयुक्तानी आदेशीत केले कार्यवाही केली नाही.

शिक्षणाधिकारी :या भागात इयत्ता ८वी पर्यंत मनपाची शाळा आहे. ८ वी च्या मुलांना इतर शाळांमध्ये प्रवेश दिला आहे.

श्री.खाजा शरफोद्दीन :सध्या तेथे मुले नाही बाजूच्या शाळेत २००-३०० मुले आहे सोयी सुविधा दिल्या जात नाही त्यामूळे संख्या कमी आहे.या भागात शाळा सुरू करावी.

मा.आयुक्त :२० मुले असतील तर शाळा सुरू केली जाईल.

श्री.प्रमोद राठोड :कलम १२ मध्ये शासकीय अथवा शासनाने नियंत्रित केलेल्या शाळा वगळता राज्यातील इतर प्राथमिक शाळेत या ठिकाणी शहरात प्राथमिक शाळा आहे कलम १३ मध्ये जे कॅपिटेशन फि संदर्भात दिले त्यांची

अमलबजावणी करतांना महापालिकेचे अधिकारी यांचे कुणी ऐकत नाही शासनाने महानगरपालिकेच्या अधिका-यांना कुठले अधिकार दिले आहेत की शासनाचे अधिकारी येथे येवून कार्यवाही करू शकतील.

संचालक(म.रा.शै.प.पुणे):चांगला प्रश्न विचारलेला आहे. हा कायदा झालेला आहे कायदा काय आहे हे समजावून घ्यावे ३१ मार्च २०१३ पर्यंत या कायदयाची अमलबजावणी करायची आहे.त्यानंतर हा कायदा कशा पध्दतीने राबवायचा याचे बाबत आदेश निघतील कॅपिटेशन फि बाबत विचारणा केली हा कायदा लोकांना माहित नाही सगळयांनाच माहित करून देवू अमंलबजावणी संबधीत शासनाचे २-३ महिण्यात आदेश निघतील कायदयात काय तरतुद केली सर्व बघणार आहोत.

जनमानसात प्रतिमा थोडी वेगळी ,परिक्षाच नाही असे म्हटले जाते या कायदयानुसार परिक्षा ही प्रवेश देतांना तसेच ८ वी वर्ग पुर्ण झाला प्रमाणपत्र दयायचे त्यावेळी घ्यायची नाही आपल्या दृष्टीने दररोज शिक्षकांना परिक्षा घ्यायची आहे.शिकवितांना मुलांना शिक्षक जेंव्हा प्रश्न विचारतात ती सुध्दा परिक्षाच आहे.विदयार्थी काय करतो त्याचे परीक्षण करतात ही सुध्दा परीक्षाच आहे.तोंडी, प्रात्यक्षिक,चाचणी परिक्षा घेता येते त्यास प्रकल्प देता येतो वर्षातून ४ चाचणी परिक्षा घेता येते.परिक्षा ऐवजी मुल्यमापन शब्द वापरतो. डायरेक्ट पास नापास करणार ही परीक्षा घेत नाही मुल्यमापनानुसार परीक्षा घेतो ,नोंदी ठेवतो त्या विदयार्थ्याकडून सर्व अभ्यास करून त्यास वरच्या वर्गात जाता येईल जर एखादा विदयार्थी मागे राहिला तर त्यास अतिरिक्त मार्गदर्शन करून पुढे न्यायचे आहे मुलाला काही येत नाही आणि ८ वी पास झाला असे चित्र असू नये.या पध्दतीने कार्यपध्दती आखलेल्या आहे त्या आपण विचारात घ्याव्या आपण सर्वांनी कायदयाच्या दृष्टीने जी कलमे आहेत त्याचा विचार करावा यानंतर आपण खुली चर्चा करावी काही शंका असेल तर विचाराव्यात.या सभेचे सर्व उपस्थित असलेल्या स.सदस्यांना धन्यवाद

श्री.गिरजाराम हळनोर :पहिली पासून शिक्षण असावे असे न करता त्यास त्याचे वयाप्रमाणे त्या वर्गात प्रवेश देवून शिक्षण देणार आहे तर मागिल वर्गाचा अभ्यासाचे काय, आताच म्हटले शाळेत पिण्याचे शुध्द पाणी , खेळाचे मैदान स्वच्छता गृह, कंपाऊड वॉल, असावे महापालिकेच्या शाळा प्रशस्त आहे जागा आहे परंतु काही शाळामध्ये पिण्याचे शुध्द पाणी व स्वच्छता गृह आवश्यक आहे या कामासाठी शासन निधी देणार आहे का?

मा.महापौर :बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम -२००९ स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळानुसार या कायद्यातील बाबीची पुर्तता महानगरपालिका प्रशासन व स.लोकप्रतिनिधी यांनी सयुक्त पणे करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते तसेच याविषयी ज्यांना आणखी

प्रश्न मांडायचे आहेत त्यांनी तसे लेखी स्वरुपात पत्र देवून माझ्याकडे कळवावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्र. संकीर्ण २०१२/अनौ १८३/प्र.क्र. ३२१/१२/नवि-२६ दिनांक २० नोंव्हेबर २०१२ रोजीचे शासन आदेशानुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम -२००९ या कायद्यातील महत्वाच्या तरतुदीची माहिती होण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम -२००९ या कायद्यात निर्देशित केलेल्या बाबीची अंमलबजावणी महानगरपालिका प्रशासन व स.लोकप्रतिनिधी यांनी संयुक्त पणे करण्याच्या या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

: